# मंत्रिमंडळ निर्णय

## ५ जुलै २०१६

## ( बैठक क्र. ९१ )

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | नागपूर-मुंबई दरम्यान महाराष्ट्र समृद्धी महामार्ग<br>**शेतकऱ्यांकडून लँड पुलिंग योजनेद्वारे पूर्वसंमतीने भागीदारी पद्धतीने जमिनी घेणार** | सार्वजनिक बांधकाम |
| २ | जमिनींचा व्यापारी व वाणिज्यिक वापर<br>**एमएसआरडीसीला जमीन हस्तांतरण करताना शुल्कात सवलत देऊन विकास करण्याचा निर्णय** | सार्वजनिक बांधकाम |
| ३ | **लातूरला कौटुंबिक न्यायालय सुरू करण्याचा निर्णय** | विधी व न्याय |
| ४ | **भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरणाची स्थापना करण्याचा मंत्रिमंडळाचा निर्णय** | मदत व पुनर्वसन |
| ५ | **अंत्योदय व बीपीएल शिधापत्रिकाधारकांना मिळणार दरमहा एक किलो तूरडाळ** | अन्न, नागरी पुरवठा |
| ६ | **महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरणासाठी सुधारीत आस्थापना मंजूर** | अल्पसंख्याक |
| ७ | **महानगरपालिका क्षेत्रात विक्री होणाऱ्या सर्वच मद्य व मद्यार्क उत्पादनांवर स्थानिक संस्था कर** | नगर विकास |

नागपूर-मुंबई दरम्यान महाराष्ट्र समृद्धी महामार्ग

**शेतकऱ्यांकडून लँड पुलिंग योजनेद्वारे**
**पूर्वसंमतीने भागीदारी पद्धतीने जमिनी घेणार**

राज्याच्या परिवहनात क्रांती घडविणारा नागपूर-मुंबई शीघ्रसंचार द्रुतगती मार्ग, त्याचे जोडरस्ते व त्यावरील प्रस्तावित नवनगरांच्या उभारणीसाठी आवश्यक असणाऱ्या जमिनी शेतकऱ्यांकडून लँड पुलिंग योजनेद्वारे पूर्वसंमती घेऊन भागीदारी पद्धतीने प्राप्त करून घेण्याच्या निर्णयास आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात तत्वत: मान्यता देण्यात आली. या मार्गाचे नामकरण महाराष्ट्र समृद्धी महामार्ग असे करण्यासह या मार्गावर उभारण्यात येणारी २४ प्रस्तावित नवनगरे ही कृषी समृद्धी केंद्रे म्हणून ओळखली जाणार आहेत.

देशाची आर्थिक व वाणिज्यिक राजधानी असणाऱ्या मुंबई महानगरातून प्रमुख राष्ट्रीय महामार्गाद्वारे देशांतर्गत मोठ्या प्रमाणात भूपृष्ठ वाहतूक होते. राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूरला मुंबई महानगराशी जोडणाऱ्या शीघ्रसंचार द्रुतगती मार्गामुळे राज्याचा संतुलित व समतोल विकास होण्यास मदत होणार आहे. त्यादृष्टीने भूसंपादनाची कामे जलद गतीने होण्यासाठी आजचा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे.

हा महामार्ग राज्यातील नागपूर, अमरावती, औरंगाबाद व नाशिक व कोकण या पाच महसूल विभागातील नागपूर, वर्धा, अमरावती, वाशिम, बुलढाणा, जालना, औरंगाबाद, अहमदनगर, नाशिक वठाणे या दहा जिल्ह्यातील २७ तालुक्यांच्या ३५० गावांमधून जाणार आहे. नागपूर ते भिवंडीपर्यंतच्या ७१० किलोमीटर अंतरापर्यंतच्या या नियोजित मार्गाची आखणी प्रामुख्याने जास्त लोकवस्ती, बागायती जमीन, मोठी धरणे, वनजमिनी, जलाशये आणि जंगले टाळून करण्यात आलेली आहे. या मार्गाची रुंदी १२० मीटर एवढी प्रशस्त असल्याने निव्वळ रस्त्यांसाठी नऊ हजार हेक्टर आणि त्याच्या जोडरस्त्यांसाठी एक हजार हेक्टर याप्रमाणे एकूण १० हजार हेक्टर जमीन आवश्यक आहे.

मंत्रिमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीने या द्रुतगती मार्गाची ग्रीन फिल्ड अलाईनमेंट (Green Field Alignment) करण्यासह या प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास अंमलबजावणी यंत्रणा म्हणून नियुक्त करण्यास मान्यता दिलेली आहे. या द्रुतगती मार्गाच्या विकास व बांधणीसाठी लँड पूल मॉडेलचा (Land Pool Model) अवलंब करण्यात येणार आहे. ही जमीन शेतकऱ्यांकडून भागीदारी पद्धतीने मिळविताना संबंधितांना जमिनीच्या मोबदल्यात यामार्गावर विविध पायाभूत सुविधांसह निर्माण करण्यात येणाऱ्या २४ नवनगरांमध्ये रहिवासी व वाणिज्यिक वापरासाठी तसेच विविध उद्योग, सेवा या क्षेत्रात भविष्यात होणाऱ्या विकासासाठी उपयुक्त ठरू शकणाऱ्या क्षेत्रात बिनशेती भूखंड देणे प्रस्तावित आहे. अशा नवनगरांसाठी प्रत्येकी ५०० हेक्टर याप्रमाणे २४ नवनगरांसाठी एकूण १२ हजार हेक्टर जमीन आवश्यक आहे. त्यामुळे आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला.

नियोजित द्रुतगती मार्ग, त्याचे जोडरस्ते आणि नवनगरे यांच्या आखणीमध्ये समाविष्ट शासकीय व सार्वजनिक उपक्रमांकडील जमिनी संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ४० नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करून विना मोबदला स्वरुपात कोणत्याही भोगवटा मुल्यांशिवाय व अनर्जित उत्पन्नाचा हिस्सा शासनास अदा करावयाच्या अटीशिवाय निर्बाध्यरित्या हस्तांतरित करणे व या जमिनींचा आगाऊ ताबा महामंडळास देण्यास मंजुरी देण्यात आली. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीस लँड पुलिंग योजनेंतर्गत भूधारकांसाठी भागीदारी किंवा देय व अनुज्ञेय लाभ यामध्ये बदल करण्याचे अधिकार राहणार आहेत.

नियोजित द्रुतगती मार्ग, अनुषंगिक कामे तसेच यापुढे राज्यातील महामार्गासाठी लागणाऱ्या जमिनी लँड पुलिंग योजनेद्वारे घेण्याची तरतूद असणारे महाराष्ट्र महामार्ग अधिनियम १९५५ मध्ये स्वतंत्र प्रकरण समाविष्ट करून महामार्ग अधिनियमात दुरूस्ती किंवा सुधारणा करणारे विधेयक आगामी विधिमंडळ अधिवेशनात सादर करण्यासही या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

नियोजित द्रुतगती मार्ग प्रकल्पामध्ये लँड पुलिंग योजनेंतर्गत भूधारकांना संपादित जमिनीच्या मोबदल्यात बिनशेती विकसित जमीन किंवा भूखंड देण्यात येणार आहेत. या लँड पुलिंग योजनेंतर्गत ही जमीन शासनामार्फत विकसित होणार असून या जमिनीस अपेक्षित बाजारमुल्य न मिळाल्यास ती शासनाकडून बाजारमुल्याने खरेदी करण्यात येणार आहे.

या द्रुतगती मार्गावर विकसित होणाऱ्या एकूण २४ क्षेत्रासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास नवनगर विकास प्राधिकरण म्हणून घोषित करण्यात आले. या मार्गाच्या आखणीमध्ये समाविष्ट पाच महसूल विभागामध्ये प्रत्येकी एक याप्रमाणे प्राधान्याने पाच नवनगरे विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी ५०० कोटी रूपये अर्थसंकल्पातून उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात आली. या नवनगरांच्या क्षेत्रात राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत कार्यान्वित असलेल्या योजनांतर्गत विविध सार्वजनिक सोयीसुविधा निर्माण करण्यास मंजुरी देण्यात आली. त्याचबरोबर कृषी व कृषीपूरक औद्योगिक व वाणिज्यिक गुंतवणूक, ग्रामीण विकास दरामध्ये होणारी वृद्धी व वाढणाऱ्या आर्थिक स्तराचा विचार करून या नवनगरांना कृषी समृद्धी केंद्र असे नाव देण्यात आले आहे. या मार्गामुळे राज्याच्या अविकसित भागामध्ये कृषी व कृषिपूरक उद्योगामध्ये होणारी वाणिज्यिक व औद्योगिक गुंतवणुकीमध्ये वाढ, ग्रामीण भागातील आर्थिक विकासाच्या दरामध्ये वाढ, ग्रामीण जीवनमान उंचावणे यास्वरुपाच्या बाबींमध्ये व्यापक स्वरूपाची विकासात्मक व समतोल समृद्धी निर्माण होणार आहे. त्यामुळे या द्रुतगती मार्गास महाराष्ट्र समृद्धी महामार्ग असे नाव देण्यात आले आहे.

------०------

सार्वजनिक बांधकाम विभाग

<u>जमिनींचा व्यापारी व वाणिज्यिक वापर</u>

**एमएसआरडीसीला जमीन हस्तांतरण करताना**
**शुल्कात सवलत देऊन विकास करण्याचा निर्णय**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास (एमएसआरडीसी) शासनाकडून देण्यात आलेल्या जमिनी आणि त्यासोबतच भविष्यात देण्यात येणाऱ्या जमिनींच्या व्यापारी व वाणिज्यिक वापरासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील कलम ४० प्रमाणे निर्बंधरित्या व अनर्जित रक्कम, अधिमूल्य, नजराणा, हस्तांतरण शुल्क आणि वापरातील बदलाबाबतचे शुल्क आकारण्यात येते. हे शुल्क भरण्यापासून सूट देण्यासह महामंडळास जमीन हस्तांतरण करणे आणि तिच्या विल्हेवाटीचे नियम शासनाच्या मान्यतेने तयार करून त्याप्रमाणे अशा जमिनींच्या विकासाच्या प्रस्तावास आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

शासनाने मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या मान्यतेने विविध प्रकल्पांसाठी “अंमलबजावणी यंत्रणा” म्हणून महामंडळास जबाबदारी सोपविली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या करारनाम्यातील अटी व शर्ती आणि महसूल व वनविभागाच्या ४ जानेवारी २०१६ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तींचा विचार करता महामंडळाकडे हस्तांतरित केलेल्या जमिनींचा व्यापारी व वाणिज्यिक तत्त्वावर विकास करून त्याद्वारे महामंडळास उत्पन्नाचा आर्थिक स्त्रोत निर्माण करणे सहज साध्य नव्हते. त्यामुळे अशा प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी महामंडळास दिलेल्या किंवा भविष्यात देण्यात येणाऱ्या शासकीय जमिनींचा

वाणिज्यिक वापर करून आवश्यक निधी उभारणे सुलभ होण्यासह महामंडळ आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी आजचा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे.

आजच्या निर्णयानुसार महामंडळाकडील जमिनींबाबत जमीन विल्हेवाट नियम तयार करून त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता प्राप्त झाल्याशिवाय या जमिनींचा कोणत्याही स्वरुपात वापर करता येणार नाही. तसेच या जमिनींच्या वापरातून प्राप्त होणारे उत्पन्न राष्ट्रीयकृत बँकेमधील खात्यात जमा करणे बंधनकारक असून त्यामधूनच भांडवली खर्च भागविण्यात येणार आहे. या खात्यातील रकमेच्या विनियोगासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली एकूण पाच जणांची सनियंत्रण समिती स्थापन करण्यात येणार आहे.

------o------

विधी व न्याय विभाग

## लातूरला कौटुंबिक न्यायालय सुरू करण्याचा निर्णय

राज्यातील वैवाहिक व कौटुंबिक वादाची प्रकरणे निकाली काढण्यासाठी कौटुंबिक न्यायालयांची असलेली आवश्यकता व उपयुक्तता विचारात घेता लातूर महापालिका क्षेत्रासाठी लातूर येथे नव्याने कौटुंबिक न्यायालय स्थापन करण्यास व त्यासाठी बारा पदांची निर्मिती करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

कौटुंबिक न्यायालय अधिनियम १९८४ च्या कलम ३(१)(अ) अन्वये उच्च न्यायालयाच्या सहमतीने दहा लक्ष किंवा अधिक लोकसंख्या असलेल्या नागरी प्रदेशासाठी कौटुंबिक न्यायालय स्थापन करण्याची तरतूद आहे, त्याबरोबरच १४ व्या वित्त आयोगानेही राज्यातील ज्या जिल्ह्यात कौटुंबिक न्यायालय कार्यान्वित नाहीत, अशा ठिकाणी न्यायालयांची स्थापना करावी अशी शिफारस केली आहे. त्यानुसार लातूर येथे कौटुंबिक न्यायालय स्थापन करण्यासह त्यासाठी आवश्यक असणाऱ्या न्यायाधीश, समुपदेशक अशा १२ पदांची निर्मिती करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी वेतन तसेच इतर आवर्ती व अनावर्ती खर्चासाठी अंदाजे ९५ लाख रुपयांच्या वार्षिक भारास मंजुरी देण्यात आली.

------o------

मदत व पुनर्वसन विभाग

## भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरणाची स्थापना करण्याचा मंत्रिमंडळाचा निर्णय

भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ च्या कलम ५१ मधील तरतुदीनुसार भूमीसंपादनाच्या संबंधातील विवाद तातडीने निकालात काढण्यासाठी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरणाची स्थापना करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार स्थापन करण्यात येणाऱ्या प्राधिकरणासाठी लागणारी विविध एकूण १३ पदे नव्याने निर्माण करण्यासही मान्यता देण्यात आली.

------o------

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

## अंत्योदय व बीपीएल शिधापत्रिकाधारकांना
## मिळणार दरमहा एक किलो तूरडाळ

राज्यात तूर डाळीचे दर वाढत असल्यामुळे सर्वसामान्य जनतेस दिलासा देण्याच्या दृष्टीने राज्यातील अंत्योदय अन्न योजना व बीपीएल मधील शिधापत्रिकाधारकांना प्रतिशिधापत्रिका प्रतिमाह १ किलो तूरडाळ १२० रूपये किलो दराने वितरित करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. त्याचा लाभ राज्यातील ७० लाख ७ हजार ५८९ शिधापत्रिकाधारकांना होणार आहे.

गेल्या काही दिवसांपासून राज्यातील तूर डाळीचे दर वाढत आहेत. त्याचा सर्वसामान्य जनतेला भार सहन करावा लागत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना तूरडाळ रास्त भावात उपलब्ध व्हावी, यासाठी राज्य शासनाने सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत तूरडाळ वितरित करण्याचा निर्णय घेतला आहे. यानुसार अंत्योदय अन्न योजनेतील २४ लाख ७२ हजार ७५३ आणि बीपीएल मधील ४५ लाख ३४ हजार ८३६ शिधापत्रिकाधारकांना प्रतिमाह १२० रूपये किलो दराने एक किलो तूरडाळ ऑगस्ट ते ऑक्टोबर २०१६ या कालावधीत वितरित केली जाणार आहे. ही तूरडाळ एनसीडीईएक्स स्पॉट एक्स्जेंजमार्फत खरेदी करण्यात येणार असून त्यासाठी ८४.७४ कोटी रूपयांच्या भांडवली खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

------o------

अल्पसंख्याक विभाग

## महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरणासाठी
## सुधारीत आस्थापना मंजूर

वक्फ न्यायाधिकरण त्रिसदस्यीय करण्यात आले असून त्यास आता दिवाणी न्यायालयाचा दर्जा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर औरंगाबाद येथील महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण त्रिसदस्यीय करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. तसेच त्यासाठी आवश्यक असलेल्या सुधारित आस्थापनेसही मंजुरी देण्यात आली.

वक्फ (सुधारणा) अधिनियम, २०१३ अन्वये वक्फ अधिनियम १९९५ मध्ये सुधारणा करण्यात आली असून कलम ८३ (४) मधील तरतुदींनुसार वक्फ न्यायाधिकरण त्रिसदस्यीय करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे कलम ८३ (५) मधील तरतुदींनुसार त्याला दिवाणी न्यायालयाचा दर्जा देण्यात आला आहे. यानुसार औरंगाबाद येथील महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण हे त्रिसदस्यीय करण्यास आज मंजुरी देण्यात आली आहे. औरंगाबाद येथील वक्फ न्यायाधिकरणासाठी यापुर्वी पिठासिन अधिकाऱ्यासह ९ पदे मंजूर करण्यात आली होती, मात्र बदललेल्या संरचनेत त्याच्या आस्थापनेत सुधारणा करण्याची आवश्यकता होती. वक्फ न्यायाधिकरणाला दिवाणी न्यायालयाचा दर्जा मिळाल्याने दिवाणी न्यायालयासाठी असणाऱ्या अस्थापनेच्या पुनर्रचनेसाठी आवश्यक पदांची निर्मिती करण्याचा आणि सध्या असलेल्या काही अनावश्यक पदे वगळण्याचा तसेच काही पदांचे रूपांतरण करण्याचा प्रस्ताव विधी व न्याय विभागाने मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव ठेवला होता, त्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.

नव्या पदरचनेनुसार १२ पदांची नव्याने भरती तर तीन पदांचे रूपांतरण करण्यात येणार असून एक पद वगळण्यात आले आहे. त्यानुसार एकूण २० पदे निर्माण करण्यात येणार आहेत. यामध्ये अध्यक्ष म्हणून जिल्हा सत्र न्यायाधिश किवा दिवाणी न्यायाधिश वर्ग -१ पेक्षा कमी नाही अशा व्यक्तीची नियुक्ती करण्यात येणार आहे. तसेच दोन सदस्यांमध्ये एक सदस्य राज्य नागरी सेवेतील अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी दर्जाचा एका अधिकारी तसेच कायद्याची पदवी धारण करणाऱ्या व मुस्लिम कायदा व विधितत्वमीमांसाचे ज्ञान असणाऱ्या व्यक्तिची नेमणूक करण्यात येणार आहे.

------o------

**महानगरपालिका क्षेत्रात विक्री होणाऱ्या सर्वच**
**मद्य व मद्यार्क उत्पादनांवर स्थानिक संस्था कर**

स्थानिक संस्था करातून सवलत दिल्यामुळे महानगरपालिकांच्या उत्पन्नामध्ये येणारी तूट भरुन काढण्यासाठी  या महापालिकांना सहाय्यक अनुदान उपलब्ध करून देणे आवश्यक होते. त्यानुसार या महापालिका क्षेत्रातील ५० कोटी रूपयांपेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांना मद्य व मद्यार्क यापासून बनवलेल्या उत्पादनाच्या विक्रीवर स्थानिक संस्था कर शासनाने ठरवून दिलेल्या दरानुसार लागू करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

शासनाने ऑगस्ट २०१५ पासून राज्यातील २५ महानगरपालिकांमधील ५० कोटी रुपयांपेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था करापासून सवलत देण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाचा फायदा राज्यातील एकूण ८ लाख ८ हजार ३९१ नोंदणीकृत व्यापाऱ्यांना (९९.०५) झाला. तसेच केवळ ११६२ नोंदणीकृत व्यापाऱ्यांना या निर्णयानंतर स्थानिक संस्था कर भरावा लागत आहे.

------o------